

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे

## श्रीमती शां. कां. गांधी कला, अमोलक विज्ञान व प. हि. गांधी वाणिज्य महाविद्यालय कडा

### ता. आष्टी जिल्हा बीड ४१४२०२

# भूगोल विभाग

प्रा. उध्दव एकनाथ चव्हाण

( विद्यावाचस्तपती )


## महाराष्ट प्रादेशिक भगोल

## महाराष्ट्र प्राकृतिक रचना

भारतीय व्दिपकल्पीय पठारी प्रदेशांपैकी असलेल्या दक्षिण भारतीय पठाराचा एक उपविभाग म्हणजेच महाराष्ट्र पठार (दखनचे पठार) होय. महाराष्ट्र हा वेगवेगळ्या प्राकृतिक रचनेमध्ये विभागलेले आहे. महाराष्ट्राच्या उत्तर भागात पूर्व-पश्चिम पसरलेली सातपुडा पर्वतरांग आहे. महाराष्ट्राच्या पश्चिम दिशेला अरबी समुद्र व पश्चिम भागात उत्तर-दक्षिण पसरलेल्या उंच सह्याद्री पर्वत रांगामुळे ( पश्चिम घाट) कोकण किनारा (कोकण किनारपट्टी) हा एक प्राकृतीक विभाग आहे. सह्याद्रीच्या मुख्य रांगेतून महाराष्ट्र पठारावर काही उपरांगा पसरलेल्या आहेत, त्यामुळे महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेत विविधता आढळते.

- उद्दीष्ट्ये:
- हा धडा पूर्ण केल्यानंतर, आपण सक्षम होऊ:
- महाराष्ट्राच्या प्राकृतिक सीमा.
- महाराष्ट्राचे प्राकृतिक विभाग.
- कोकण किनारपट्टीची रचना.
- कोकण किनारपट्टीचे उपविभाग.
- कोकणातील नद्या व त्यावरील खाड्या.
- सह्याद्री व सह्याद्री पर्वताचे वैशिष्ट्ये.
- प्रमुख घाट व महामार्ग.
- महाराष्ट्र पठारावरील विविध डोंगररांगा.
- महाराष्ट्र पठारावरील नद्यांची खोरी.
- मृदांचे प्रकार.
- प्रदेश संकल्पना व भुमीउपयोजन.

## महाराष्ट्र प्राकृतिक विभाग




### अ) महाराष्ट्राच्या प्राकृतिक सीमा:

१) उत्तरेस सातपुडा पर्वत, चिखलदरा डोंगर (गाविलगड टेकड्या), तोरणमाळचे डोंगर.

२) पूर्वेस चिरोल टेकड्या, आहिरी टेकड्या.

३) दक्षिणेस ताम्रपर्णी नदी, मांजरा डोंगर, चिकोडी रांगा.

४) पश्चिमेस अरबी समुद्र.

### आ) महाराष्ट्राचे प्राकृतिक विभाग:

१) **कोकण किनारपट्टी:** पश्चिम/ कोकण किनारपट्टीच्या प्रदेशाचे तीन भागांत वर्गीकरण केले जाते. त्यातील सुरत ते गोवा इथपर्यंतची किनारपट्टी ही कोकण किनारपट्टी म्हणून ओळखली जाते.

महाराष्ट्रच्या दृष्टिकोनातून विचार करता कोकण किनारपट्टीचा विस्तार उत्तरेकडील बोर्डी तळासरी ते दक्षिणेकडील तेरेखोलच्या खाडीपर्यंत आहे, तर पूर्व-पश्चिम विस्तार हा महाराष्ट्राच्या पश्चिमेस असलेल्या अरबी समुद्रापासून तर सह्याद्री पर्वतापर्यंत आहे.

२) **निर्मिती:** महाराष्ट्र पठाराचा पश्चिमेकडील भाग प्रस्तर भंगामुळे खाली खचल्यामुळे कोकणची अरुंद किनारपट्टी निर्माण झाली आहे. प्रस्तर खाली खचलेल्या भागाच्या पूर्वेकडे सह्याद्रीचा तीव्र उताराचा कड्यासारखा भाग उभारला व पश्चिमेकडील काही भाग समुद्रात तर काही भाग उंच सारखा कोकण म्हणून तयार झाला आहे.

३) **विस्तार:** उत्तरेस पालघर जिल्ह्यातील बोर्डी तळासरी खाडीपासून (दमणगंगा नदी खोरे) ते दक्षिणेस सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तेरेखोल नदी खाडीपर्यंत, दक्षिणोत्तर विस्तारलेला चिंचोळा निमुळता प्रदेश म्हणजे कोकण किनारपट्टी होय. पूर्वेकडून पश्चिमेकडे खूप तीव्र स्वरूपाचा उतार आहे.

४) **लांबी, रुंदी, उंची व क्षेत्रफळ:** पश्चिम/ कोकण किनारपट्टी ची दक्षिणोत्तर लांबी ५६० किमी. असून कोकण किनारपट्टीला लागून असणाऱ्या समुद्र किनारपट्टीची लांबी ७२० किमी. एवढी आहे. कोकण किनारपट्टी ही सरळ रेषेसारखी नसून ती ठिकठिकाणी वक्राकार आहे. त्यामुळे त्या कोकण किनारपट्टीस दंतुर किनारपट्टी असेही म्हटले जाते. कोकण किनारपट्टीची रुंदी ३० ते ६० किमी. (सरासरी ४४.७ किमी.) असून उल्हास नदीच्या खोऱ्यात सर्वात जास्त म्हणजे १०० किमी. पर्यंत (वसई ते हरिश्चंद्रगड) विस्तारलेली आहे. कोकण किनारपट्टी ची सर्वात कमी रुंदी सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ येथील रांगणा किल्ल्या जवळ ४० किमी. आहे. तर सर्वात जास्त ठाणे जिल्ह्यात ८५ ते १०० किमी. एवढी आहे. तसेच समुद्रसपाटीपासून कोकण किनारपट्टी ची उंची ५ मीटरपासून ३०० मीटर पर्यंत एवढी आहे. किनारपट्टीची रुंदी उत्तरेकडून दक्षिणेकडे कमी-कमी होत गेलेली आहे त्यामुळे किनारपट्टी उत्तरेकडून दक्षिणेकडे निमुळती होत गेली आहे. कोकण किनारपट्टी चे एकूण क्षेत्रफळ ३०,३९४ चौ किमी. आहे. कोकण किनारपट्टीचा सर्वाधिक समुद्रकिनारा लाभलेला जिल्हा रत्नागिरी तर सर्वात कमी समुद्रकिनारा ठाणे जिल्ह्याला लाभलेला आहे.

५) **कोकण किनारपट्टीची रचना**: कोकण किनारपट्टीची रचना नद्या व डोंगररांगांनी तयारझालेला प्रदेश आहे. सह्याद्री पर्वतावर उगम पावणाऱ्या असंख्य नद्या पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत अरबी सागराला जाऊन मिळतात. नद्यांच्या दरम्यान सह्याद्रीच्या पश्चिमेकडे गेलेल्या उप डोंगररांगा समुद्रापर्यंत

विस्तारलेल्या आहेत. सह्याद्रीच्या उपरांगांनी कोकणातील नद्यांची खोरी अलग-अलग केलेली आहेत. कोकण किनारपट्टीवर समुद्राला येऊन मिळणाऱ्या असंख्य नद्यांमुळे येथील किनारपट्टी खंडित झालेली आहे. त्यामुळे कोकण किनारपट्टी ही रिया प्रकारची आहे. कोकण किनारपट्टीवर उत्तर भागात तांबूस-तपकिरी मृदा आढळते तर दक्षिणेकडील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यामध्ये जांभा मृदा आढळते.

६) **उपविभाग:** कुंडलिका नदीखोरे यामुळे कोकण किनारपट्टी दोन भागांत विभागली जाते.

१) **उत्तर कोकण:** जिल्हे: मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर.

२) **दक्षिण कोकण:** जिल्हे: रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

अ) **खलाटी:** पश्चिमेकडील अरबी समुद्र लगतच्या सखल भागास खलाटी असे म्हणतात. या भागाची उंची ५ ते १५ मीटर किंवा त्यापेक्षा अधिक आहे. उतार सौम्य आहे. या भागात लहान मैदाने, खाड्या, वाळूचे दांडे, खाजणे, चौपाटी तसेच समुद्रलाटांनी तयार केलेली भूरूपे आढळतात.

आ) **वलाटी:** कोकण किनारपट्टीचा सह्याद्री पर्वताकडील पायथ्यालगतच्या भागाला वलाटी असे म्हणतात. या भागाची उंची सरासरी २०० ते ३०० मीटर आहे तर उतार तीव्र स्वरूपाचा आहे. डोंगराळ भाग व वेगाने वाहणाऱ्या नद्या, दऱ्याखोऱ्यांचा प्रदेश हे या भागाचे वैशिष्ट्य आहे.

७) **भूरूपे:** कोकण किनारपट्टीला लागून असणाऱ्या अरबी समुद्रातील सागरी लाटांचे खनन कार्य सतत चालू असते. त्यामुळे या भागात सागरीकडे, सागरी गुहा, चौपाटी, वाळूचे दांडे, चबुतरे अशी अनेक भूरूपे तयार झाली आहेत. विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यात समुद्रकिनारी अशी तयार झालेली भूरूपे मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळतात.

१) **खाडी:** नद्या आपल्या प्रवासा दरम्यान समुद्राला ज्या ठिकाणी जाऊन मिळते त्याठिकाणी नदीचे पाणी समुद्रात जाऊन मिळते परंतु त्याच बरोबर समुद्राचे पाणी नदीच्या मुखामध्ये आतपर्यंत शिरत. समुद्राचे पाणी नदीच्या मुखात जिथपर्यंत आतमध्ये शिरते तिथपर्यंतच्या भागास खाडी असे म्हणतात. पश्चिम किनारपट्टी चे खाडी हे वैशिष्ट्य आहे. खाडीचे पाणी निमखारे असते.

८) **कोकणातील खाड्या:**

१) पालघर :डहाणू, दातीवरा, वसई

२) ठाणे जिल्हा: ठाणे.

३) मुंबई शहर / उपनगर: मनोरी, मालाड, माहीम.

४) रायगड जिल्हा: धरमतर, रोहा, पनवेल, राजपुरी, बाणकोट.

५) रत्नागिरी जिल्हा: केळशी, दाभोळ, जयगड, भाट्ये, पूर्णगड, जैतापुर, विजयदुर्ग (रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सीमेवर).

६) सिंधुदुर्ग जिल्हा:- देवगड, आचरा, कलावली, कर्ली, तेरेखोल.

**९) कोकणातील नद्या व त्यावरील खाड्या:**

| | नदी | खाडी | जिल्हा |
|---|---|---|---|
| १) | वैतरणा | दातिवरा | पालघर |
| २) | उल्हास | वसई | पालघर |
| ३) | पाताळगंगा | धरमतर | रायगड |
| ४) | कुंडलिका | रोह्याची खाडी | रायगड |
| ५) | सावित्री | बाणकोट | रायगड |
| ६) | वाशिष्टी | दाभोळ | रत्नागिरी |
| ७) | शास्त्री | जयगड | रत्नागिरी |
| ८) | शुक | विजयदुर्ग | रत्नागिरी व सिंधुदुर्ग सीमेवर |
| ९) | गड | कलावली | सिंधुदुर्ग |
| १०) | कर्ली | कर्ली | सिंधुदुर्ग |
| ११) | तेरेखोल | तेरेखोल | सिंधुदुर्ग |

**१०) बंदरे:**

कोकण किनारपट्टीचा किनारा दंतुर असल्याने कोकण किनारपट्टीवर उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत असंख्य नैसर्गिक बंदरे निर्माण झाली आहेत. एकुण ४९ बंदरे या कोकण किनारपट्टीवर असून मुंबई हे त्यातील प्रमुख बंदर आहे. त्याचबरोबर अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, रायगड, रत्नागिरी इत्यादी लहान – मोठी बंदरे आहेत.

**११) बेटे:**

कोकण किनारपट्टीवर नैसर्गिकरित्या असंख्य बेटांची निर्मिती झाली असून, मुंबई हे कोकण किनारपट्टीवरील सर्वात मोठे सात बेटांचा समूह मिळून तयार झालेले आहे. इतर लहान मोठी बेटे कोकण

किनारपट्टीवरील कासा, जंजिरा, कुलाबा, खांदेरी, उंदेरी (रायगड), साष्टी, मढ, कुलाबा, छोटा कुलाबा, माजगाव, परळ, माहिम (मुंबई शहर व मुंबई उपनगर), कुरटे (सिंधुदुर्ग), अंजदीव, घारापुरी (एलिफंटा गुहा) ईत्यादी बेटे पश्चिम किनाऱ्यावर आहेत.

**१२) चौपाटी (पुळणी):**

समुद्राच्या लाटांनी किनारपट्टीवर वाळूच्या निक्षेपणाने संचयित केलेला वाळूचा भूभाग म्हणजे पुळण म्हणून ओळखला जातो. त्यालाच आपण चौपाटी असे म्हणतो. किनारपट्टीच्या जमिनीकडील बाजूस विस्तीर्ण पुळणी व मऊ वाळूच पट्टे म्हणजेच कोकणातील चौपाटीचा भाग होय.उदा: जुहू चौपाटी, गिरगाव चौपाटी.

**२) पश्चिम घाट ( सह्याद्री):**

पश्र्चिम घाट, सह्य पर्वत. भारतीय व्दिपकल्पाच्या पश्चिम भागातील एक पर्वतश्रेणी. दख्खनच्या पठाराच्या पश्र्चिम कडेवर उत्तर-दक्षिण पसरलेल्या या पर्वतश्रेणीमुळे अरबी समुद्र किनाऱ्यावरील किनारपट्टीचे मैदान दख्खनच्या पठारापासून अलग झाले आहे. उत्तरेस तापी नदीपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत अरबी समुद्राला समांतर अशी ही श्रेणी पसरली  आहे. सह्याद्रीची उत्तर-दक्षिण लांबी सु. १,६०० किमी. असून सस. पासून सरासरी उंची सु. १,२०० मी. आहे. पर्वताचा पश्र्चिम उतार तीव्र तर पूर्वेकडे पठारी भागाकडील उतार तुलनेने मंद आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ व तमिळनाडू या राज्यांतील सु. ६०,००० चौ. किमी. क्षेत्र सह्याद्रीच्या श्रेण्यांनी व्यापले आहे.

**१) विस्तार:**

पिश्चम घाटाचा/ सह्याद्रीचा विस्तार उत्तरेस नंदुरबार जिल्ह्यातील तापी नदी खोऱ्यापासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यँत आहे. महाराष्ट्रात पश्चिम घाटाचा विस्तार हा दक्षिणेस कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड पर्यंत आहे. पश्चिम बाजूने किनारपट्टी खचल्याने सह्याद्री पर्वत पश्चिमेस भिंतीसारखा सरळ किंवा अति तीव्र उताराचा दिसतो, तर पूर्वेस सह्याद्रीचा उतार मंद होत जातो.

**२) लांबी आणि रुंदी :**

पिश्चम घाटाचा /सह्याद्रीची एकूण लांबी १६०० किमी. असून महाराष्ट्रातील लांबी ६५० किमी. इतकी आहे. समुद्रसपाटीपासून पश्चिम घाटाची  उंची ९१५ ते १२२० मिटर आहे. समुद्रकिनाऱ्यापासून

सह्याद्रीचे अंतर ३० ते ६० किमी. ईतकी आहे. सह्याद्री पर्वतरांगेची रुंदी उत्तरेस जास्त असून, दक्षिणेस कमी दिसून येते.

**३) सह्याद्री पर्वताचे वैशिष्ट्ये:**

सह्याद्री पर्वताची बऱ्याच ठिकाणी झीज झालेली आहे. त्यामुळे काही ठिकाणी उंची कमी झालेली आहे. तर काही ठिकाणी बराच भाग उंच दिसून येतो. काही भागात पर्वताच्या उत्तर बऱ्याच ठिकाणी कमी आहे. या पर्वताची पश्चिम बाजू तीव्र उताराची असून पूर्व भागाचा उतार सौम्य आहे. तर काही ठिकाणी डोंगर माथ्यावर सपाट भाग तयार झालेला आहे. उदा: महाबळेश्वर, पाचगणी परिसर सपाट/ टेबल लँड म्हणून ओळखला जातो. जैवविविधतेच्या दृष्टिकोनातून सह्याद्री पर्वतावरील कास पठार हे जागतिक वारसा म्हणुन (जिल्हा सातारा) महत्वपूर्ण आहे.

**४) प्रमुख जलविभाजक:**

महाराष्ट्राचा प्राकृतिक रचनेत सह्याद्रीचे स्थान खूप महत्वाचे असून, त्यास महाराष्ट्राचा प्राकृतिक रचनेचा मानदंड म्हटले जाते. महाराष्ट्राच्या पश्चिम भागातून उत्तर-दक्षिण गेलेल्या या पर्वतरांगेवर महाराष्ट्रातील नद्यांचे उगमस्थान आहे. महाराष्ट्रातील या नद्यांची पूर्ववाहिनी व पश्चिमवाहिनी नद्या अशी विभागणी केली जाते. सह्याद्री पर्वतात उगम पावून पठारावरून पूर्वेकडे वाहत जाणाऱ्या पूर्ववाहिनी नद्या तर सह्याद्रीमध्ये उगम पावून कोकण किनारपट्टी (पश्चिमे)कडे वाहत जाणाऱ्या पश्चिम वाहिनी नद्या त्यामुळे सह्याद्रीस महाराष्ट्राचा प्रमुख जलविभाजक मानले जाते. सह्याद्री पर्वत महाराष्ट्राच्या पश्चिम सीमेवर अशा रीतीने उभा आहे, की नैऋत्येकडून येणारे मोसमी वारे अडविले जाऊन सह्याद्रीच्या पश्चिमेकडे कोकणात अधिक पाऊस देतात, तर पश्चिम घाट/ सह्याद्री पर्वत ओलांडल्यानंतर या मौसमी वाऱ्यात कमी पाणी शिल्लक राहिल्याने सह्याद्रीच्या पूर्वेला देशावर पावसाचे प्रमाण कमी असते.

**५) घाटमार्ग:**

सह्याद्री पर्वत कोकण व महाराष्ट् पठार यांच्यादरम्यान असल्याने कोकणातून पठारावर जाण्याकरिता सह्याद्री पर्वत ओलांडून जावे लागते. याकरिता सह्याद्री पर्वताची उंची जेथे – जेथे कमी झालेली आहे, त्याठिकाणी घाटमार्ग तयार करण्यात आले आहेत. नाशिक – जव्हार – शिरघाट, नाशिक – मुंबई-थळ (कसारा घाट), ठाणे – नगर-माळशेज,

कल्याण – जुन्नर-नाणेघाट, पनवेल – नारायणगाव (मंचरमार्गे) भीमाशंकरघाट, महाड– महाबळेश्वर -पारघाट (रणतुंडी), मुंबई – पुणे-बोरघाट, नाशिक – धुळे-लळींगघाट, महाड – पुणे –वरंधा, कोल्हापूर – कणकवली हनुमंते, महाड – खेड – दापोली कशेडीघाट, कोल्हापूर – राजापूर करूळ, पुणे – सातारा कात्रज व खंबाटकी, चिपळूण – कराड कुंभार्ली, पाचगणी – वाई परसनी, रत्नागिरी – कोल्हापूर आंबाघाट, सावंतवाडी – कोल्हापूर फोंडाघाट, राजापूर – कोल्हापूर अणुस्कुराघाट, नाशिक -पुणे चंदनापरी, धुळे – औरंगाबाद औट्रम (कन्नड घाट), सावंतवाडी – बेळगाव आंबोलीघाट, पुणे – बारामती (सासवडमार्गे )दिवे घाट, पुणे – माणगाव ताम्हणीघाट, महाबळेश्वर – पोलादपूर आंबेनळीघाट.

६) **प्रमुख घाटमार्ग व महामार्ग:**महाराष्ट्रातील काही प्रमुख राष्ट्रीय महामार्गावर हे घाटमार्ग आहेत. माळशेजघाट – राष्ट्रीय महामार्ग क्रमांक- २२२, औट्रमघाट (कन्नड ) – राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११, कसारा (थळ) – राष्ट्रीय महामार्ग क्रमांक -०३, चंदनापरी – राष्ट्रीय महामार्ग क्रमांक- ५०, बोर – राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-०४, खंबाटकी – राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-०४ (खंडाळा), आंबा – राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-२०४, लळींग घाट – राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-०३, कशेडी घाट – राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-१७.

७) **सह्याद्री पर्वत उंची:**

महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वताची सरासरी उंची ९०० मिटर आहे. परंतु सह्याद्री पर्वत सलग एकसारखा उंच नसून उत्तरेकडे सह्याद्री अधिक उंच आहे, तर दक्षिणेकडे सह्याद्रिची उंची कमी होत जाते. सह्याद्री पर्वतातील सर्वोच्च शिखर कळसुबाई असून ते अहमदनगर व नाशिक जिल्ह्याच्या सीमेवर इगतपुरीजवळ आहे. परंतु प्रशासकीय दृष्ट्या अहमदनगर जिल्ह्यात असून त्याची उंची १६४६ मीटर इतकी आहे.

| शिखर | उंची (मीटरमध्ये) | जिल्हा |
|---|---|---|
| कळसुबाई | १६४६ | अहमदनगर |
| साल्हेर | १५६७ | नाशिक |
| महाबळेश्वर | १४३८ | सातारा |
| हरिश्चंद्रगड | १४२४ | अहमदनगर |

| | | |
|---|---|---|
| सप्तशृंगी | १४१६ | नाशिक |
| तोरणा | १४०४ | पुणे |
| राजगड | १३७६ | पुणे |
| त्र्यंबकेश्वर | १३०४ | नाशिक |
| सिंगी | १२९३ | नाशिक |
| नाणेघाट | १२६४ | अहमदनगर |
| तौला | १२६१ | नाशिक |
| ताम्हणी | १२२६ | पुणे |
| गडलगट्टा | ९६७ | गडचिरोली. |

### ३) महाराष्ट्र पठार:

आल्फ्रेड वेनगर यांनी मांडलेल्या खंड- वहनाच्या सिद्धांतानुसार महाराष्ट्राच्या भूसीमेचा गोंडवानामध्ये समावेश होतो. गोंडवाना भूमी अतिप्राचीन समजले जाते. भारतातील प्राकृतिक विभागांपैकी एक असणाऱ्या द्विकल्पीय पठाराचा भाग म्हणजे दखनचे पठाराचाच एक उपविभाग म्हणजे महाराष्ट्र पठार होय. महाराष्ट्र पठाराने महाराष्ट्राच्या भूमीपैकी ९० टक्के भूभाग बनलेला आहे. पश्चिमेस सह्याद्री पर्वतापासून ते पूर्वेस गडचिरोली जिल्ह्यातील चिरोली टेकड्यांपर्यंत सुमारे ७५० किमी. रूंद, तर उत्तरेस सातपुडा पर्वतापासून दक्षिणेस तिलादीपर्यंत सुमारे ७०० किमी. लांबी आहे. महाराष्ट्र पठाराचे एकूण क्षेत्रफळ २७६ लाख हेक्टर (२..७६ लाख चौरस. किमी.) आहे. सुमारे ७ कोटी वर्षांपूर्वी भारतीय द्वीपकल्पाच्या दक्षिण – पश्चिम भागात झालेल्या ज्वालामुखीच्या भेगी उद्रेकातून बाहेर आलेल्या लाव्हा रसाचे थर एकमेकांवर साचून (सुमारे ४० थर) या पठाराची निर्मिती झाली आहे.

यालाच ‘डेक्कन ट्रॅप’ असेही म्हटले जाते. महाराष्ट्र पठारावर असलेल्या लाव्हारसाच्या थरांची जाडी ही पश्चिमेकडे सह्याद्री पर्वतांमध्ये अधिक तर पूर्वेला विदर्भाकडे कमी होत जाते. त्यामुळे पठाराची उंचीही पश्चिमेकडून पूर्वेकडे कमी होत जाते. म्हणजेच पठाराचा उतार हा पूर्वेकडे (आग्नेयेकडे) आहे. पठारावरून वाहणाऱ्या नद्यांनी केलेल्या खनन कार्यामुळे महाराष्ट्र पठारावर अनेक डोंगररांगा व नद्यांची खोरी निर्माण झाली आहेत. महाराष्ट्र पठाराचे पश्चिम पठार व पूर्व पठार अशी दोन भागात

विभागणी केली जाते. पश्चिम पठार हे सपाट नसून नद्या व डोंगररांगांनी बनलेला प्रदेश आहे तर पूर्व पठार हा मैदानी प्रदेश असून दुर-दुर पर्यंत कोणताही भू-उठाव दिसून येत नाही.

### ४) महाराष्ट्र पठारावरील विविध डोंगररांगा:

#### अ) सातमाळा अजिंठा डोंगररांग:

सातमाळा अजिंठा डोंगररांग ही सह्याद्री पर्वताची पूर्वेकडे जाणारी प्रमुख उपरांग आहे. सह्याद्री मधील नाशिक जिल्ह्यातील शिखरापासून पूर्वेकडे यवतमाळ जिल्हा पर्यंत विस्तार आहे. नाशिक जिल्ह्यात या रांगेला सातमाळची डोंगररांग म्हणून, तर पुढे औरंगाबाद जिल्ह्यात अजिंठ्याची डोंगररांग असे म्हणतात. या डोंगररांगेची उंची पूर्वेकडे कमी होत जाते. या डोंगररांगेने उत्तरेकडील तापी या पश्चिम वाहिनी व दक्षिणेकडील गोदावरी या पूर्ववाहिनी नद्यांची खोरी वेगवेगळी केलेली आहेत. नाशिक जिल्ह्यात सातमाळ डोंगर रांगेवर सप्तशृंगी देवीचे मंदिर आहे. तर औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा डोंगररांगेत जगातील सुप्रसिद्ध अजिंठा लेणी व वेरुळ लेणी आहेत. अजिंठा डोंगररांगेच्या पूर्वेला दोन शाखा होतात. दक्षिणेकडील नांदेड जिल्ह्यात जाणारी निर्मल डोंगररांग व दुसरी उत्तरेला यवतमाळ जिल्ह्यात जाणारी अजिंठा डोंगररांग होय.

#### आ) पठार प्रदेश:

सातमाळ या डोंगररांगेच्या उत्तर दिशेला मालेगाव पठार तर अजिंठा डोंगररांगेच्या पूर्व दिशेला बुलढाणा पठार आहे.

#### इ) हरिश्चंद्र बालाघाट डोंगर रांगा:

सह्याद्री पर्वतातील कळसुबाई शिखरा पासून ही डोंगर रांग पूर्वेकडे (आग्नेय) बीड,उस्मानाबाद, लातूर जिल्हा पर्यंत पसरलेली आहे. अहमदनगर जिल्ह्यात या डोंगररांगेस हरिश्चंद्रगड असे म्हणतात. तर बीड जिल्ह्यात ही डोंगररांग "बालाघाट" या नावाने ओळखली जाते. या डोंगररांगेने उत्तरेकडील पूर्ववाहिनी गोदावरी व दक्षिणेकडील पूर्व वाहिनी कृष्णा नदी या दोन नद्यांची खोरी वेगवेगळी केलेली आहेत.

#### ई) पठारी प्रदेश:

हरिश्चंद्रगड डोंगररांगेच्या दक्षिण दिशेला अहमदनगर पठार आहे. बालाघाट डोंगर रांगेच्या पश्चिमेला बालाघाट पठार आहे. तर मांजरा नदीच्या खोऱ्यात मांजरा पठार आहे.

#### उ) शंभू महादेव डोंगररांग:

सह्याद्रीमधील महाबळेश्वरपासून आग्नेयेकडे जानारी शंभू-महादेव डोंगररांग महाराष्ट्रातील सातारा व सांगली जिल्ह्यांतून पुढे कर्नाटकात प्रवेश करते. या डोंगर रांगेवर वसलेल्या शिखरशिंगणापूर (ता. फलटण, जिल्हा सातारा) येथे असलेल्या शंभू महादेवाच्या पवित्र स्थानामुळे या डोंगर रांगेस शंभू महादेवाचे डोंगर असे म्हणतात. या डोंगर मुळे उत्तरेकडील पूर्व वाहिनी भीमा व दक्षिणेकडील पूर्व वाहिनी कृष्णा या दोन नद्यांची खोरी विभक्त केलेली आहेत. या डोंगरच्या काही उपरांगा खालील प्रमाणे आहे. सातारा जिल्ह्याच्या पूर्वेस “सीताबाई डोंगर”, तर उत्तर दक्षिण “बामनोली डोंगर”, सातारा जिल्ह्याच्या दक्षिणेस “आगाशिवा डोंगर” व पश्चिमेस “यवतेश्वर डोंगर”, या डोंगररांगेवर टेबल लैंड करिता प्रसिद्ध असलेले “पाचगणी” हे थंड हवेचे ठिकाण आहे.

**१) पठारी प्रदेश:**

शंभू महादेव डोंगर रांगेच्या पश्चिम दिशेला महाबळेश्वर व पाचगणी ही पठारे आहेत. शंभू महादेवाच्या डोंगर रांगेच्या मध्यभागात औंध चे पठार आहे. शंभू महादेवाचा डोंगर रांगेच्या दक्षिणेला खानापूरचे पठार आहे व त्यापुढे सांगली जिल्ह्यात जत चे पठार आहे. शंभू महादेव डोंगर रांगेच्या उत्तरेला पुणे जिल्ह्यात सासवडचे पठार आहे.

**ऊ) सातपुडा पर्वत:**

महाराष्ट्र पठाराच्या उत्तर सीमेवरून पूर्व-पश्चिम समांतर पसरलेली डोंगररांग म्हणजे सातपुडा पर्वत होय. या पर्वतात एकापाठोपाठ एक अशा सात डोंगररांगा किंवा सात पुढे, ७ वळ्या ६०० मीटर उंचीपर्यंत वाढत जातात. तसेच उत्तरेस नर्मदा नदीकडे खाली उतरताना त्या दिसतात या रांगा एकमेकांना समांतर आहेत. त्यावरून त्यास सातपुडा (सेव्हन फोल्डर्स) असे म्हणतात. भारतातीय हिमालया नंतर विंध्य सातपुडा डोंगर प्रमुख जलोत्सारक आहे.

**१) विस्तार:**

गुजरातमधील रतनपुर पासून पूर्वेस मध्यप्रदेशातील अमरकंटक पर्यंत पसरलेल्या या पर्वत श्रेणीची लांबी सुमारे ९०० किमी. व रुंदी कमाल १६० किमी. आहे. या डोंगर रांगेचा आकार सर्वसाधारण त्रिकोणाकृती असून पाया पूर्वेस उत्तर-दक्षिण पसरलेल्या मैकल डोंगररांगेत आहे. तर शिरोभाग पश्चिमेस राजपिपला डोंगररांगत आहे. महाराष्ट्राचा विचार करता या डोंगररांगेतील तोरणमाळ डोंगररांग नंदुरबार, धुळे व जळगाव या जिल्ह्यांतून पश्चिम-पूर्व जाते, तर गाविलगड डोंगर (टेकड्या) अमरावती जिल्ह्यातून जातात.

या डोंगराची सरासरी उंची १००० मीटर आहे. सातपुडा हा चंद्रकोरी आकाराचा असून त्याचा दक्षिणस उतार तीव्र आहे, तर उत्तरेकडील उतारा लहान-मोठ्या टेकड्यांच्या स्वरूपात मंद होत गेलेला आहे.

**२) सातपुडा पर्वतातील महाराष्ट्रातील प्रमुख डोंगररांगा**

**अ) तोरणमाळ डोंगररांग:**

तोरणमाळ डोंगररांग रांग नंदुरबार जिल्ह्याच्या उत्तर भागातून जळगाव जिल्ह्यातील चोपडा, यावल, रावेर तालुक्यात पश्चिम-पूर्व दिशेत लांबी १०० किमी. आहे. या डोंगररांगेने उत्तरेकडील पश्चिम वाहिनी नदी नर्मदा व दक्षिणेकडील पश्चिम वाहिनी नदी तापी या दोन नद्यांची खोरी विभक्त केलेली आहेत. या डोंगररांगेतील “अस्तंभा डोंगर” हे महाराष्ट्रातील सातपुडा तील सर्वोच्च शिखर आहे, त्याची उंची १६२५ मी आहे. नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ हे नाव तोरणाच्या फुलांवरून नाव प्रचलित आसुन,हे थंड हवेचे ठिकाण आहे तर जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यात “पाल” हे थंड हवेचे ठिकाण आहे.

**आ) गाविलगड डोंगर:**

अमरावती जिल्ह्यातील वायव्य भागात धारणी, चिखलदरा या तालुक्यांतून जाणाऱ्या सातपुडा पर्वताच्या डोंगर रांगा गाविलगडच्या टेकड्या या स्थानिक नावाने ओळखतात. अमरावती जिल्ह्यात सातपुडा पर्वतांची पूर्व-पश्चिम लांबी १०० किमी. आहे. गाविलगड डोंगर रांग ही तापी नदी व पूर्णा नदी या दोन नद्यांच्या दरम्यान आहे. गाविलगड डोंगरातील “वैराट डोंगर” हे सर्वोच्च शिखर असून त्याची उंची ११७७ मीटर इतकी आहे. या डोंगररांगेत “चिखलदरा” हे थंड हवेचे ठिकाण आहे.

**३) सातपुडा पर्वतातील शिखरे:**

अ) अस्तंभा डोंगर (तोरणमाळची डोंगररांग) १३२५ मीटर, जिल्हा नंदुरबार.

आ) वैराट डोंगर (गाविलगडचा डोंगर) ११७७ मीटर, जिल्हा अमरावती.

इ) चिखलदरा (गाविलगडचा डोंगर) १११८ मीटर, जिल्हा अमरावती.

**४) महाराष्ट्र पठारावरील नद्यांची खोरी:**

**१) तापी-पूर्णा खोरे:**

सातपुडा पर्वत व सातमाळ, अजिंठा डोंगररांगा दरम्यान तापी-पूर्णा खोरे पसरलेले आहे. या खोऱ्यातून तापी व पूर्ण या नद्या पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात. प्रस्तर भंगामुळे हे खोरे खचदरी स्वरूपाचे आहे. या नदीखोऱ्यात जळगाव, धुळे, नंदुरबार व नाशिक तसेच विदर्भातील बुलढाणा,

अकोला, वाशिम, अमरावती या जिल्ह्यांचा समावेश होतो. या नदीखोऱ्यांचे एकूण क्षेत्रफळ ५१,७०४ चौ. कि. मी. आहे.

**२) गोदावरी खोरे:**

सातमाळ अजिंठा डोंगररांगा व हरिश्चंद्र बालाघाट डोंगररांगा दरम्यान गोदावरी नदीचे मुख्य खोरे पसरलेले आहे. या नदीखोऱ्यांचे स्वरूप पश्चिमेकडे अरुंद तर पूर्वेकडे रुंद होत गेले आहे. या नदीखोऱ्यात नाशिक, अहमदनगर व मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांचा समावेश होतो. या नदीखोऱ्यांचे एकूण क्षेत्रफळ विदर्भातील प्राणहिता नदी खोऱ्यासह १,५१,७८८ चौ.कि. असून महाराष्ट्राचे सर्वाधिक क्षेत्र गोदावरी खोऱ्याने व्यापलेले आहे. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४९ टक्के क्षेत्र गोदावरी खोऱ्याने व्यापलेला आहे.

**३) भीमा खोरे:**

भीमा नदी ही कृष्णेची उपनदी असली तरी कृष्णेला ती कर्नाटकात जाऊन मिळते. तसेच महाराष्ट्रात भीमेचे स्वतंत्र अस्तित्व असल्याने त्याचा स्वतंत्र अभ्यास केला जातो. हरिश्चंद्र, बालाघाट डोंगररांग व शंभू महादेवाच्या डोंगररांगेदरम्यान भीमा नदीचे खोरे पसरलेले आहे. या खोऱ्याचा आकार आयताकृती असून उतार आग्नेयेकडे आहे. या खोऱ्यात पुणे, सोलापूर, सातारा जिल्ह्याचा उत्तर भाग, नगर जिल्ह्याचा दक्षिण भाग, त्याचबरोबर उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातील काही भागाचा समावेश होतो. या नदीखोऱ्याचे एकूण क्षेत्रफळ ४६,१८४ चौ. कि. मी. आहे.

**४) कृष्णा नदीखोरे:**

पश्चिमेला सह्याद्री पर्वत व उत्तर-पूर्वेला शंभू महादेवाचे डोंगर या दरम्यान त्रिकोणाकृती या नदीखोऱ्याचा विस्तार आहे. या नदीखोऱ्यात सातारा जिल्ह्याचा दक्षिण भाग, सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचा भाग येतो. या नदीखोऱ्याने महाराष्ट्रातील एकूण २८,७०० चौ. कि. मी. क्षेत्रफळ व्यापले आहे.

**५) पूर्व पठार रचना:**

पेनगंगा ते इंद्रावती नदी दरम्यान चा भाग पूर्व पठाराचा म्हणून ओळखला जातो. पूर्व पठाराची रचना पुढीलप्रमाणे...

**१) आर्वी पठार:** वर्धा व कन्हान या नद्यांच्या दरम्यान आर्वी पठार पसरलेला आहे.

२) **रामटेक टेकड्या:** कन्हान नदीच्या पूर्वेस असणाऱ्या या टेकड्यांत पेंच व बावनथडी सारख्या अनेक नद्यांचे उगम आहेत.

३) **नागपूर मैदान:** नागपूरच्या सभोवताली कन्हान व तिच्या उपनद्यांनी तयार केलेली मैदाने.

४) **वर्धा मैदान:**

वर्धा नदीच्या खोऱ्यातील उत्तरेकडील वर्धा यवतमाळ व उत्तर चंद्रपूर या जिल्ह्यांत उर्ध्व वर्धा मैदान तर दक्षिण चंद्रपूर जिल्ह्यात निम्न वर्धा मैदान आहे.

५) **वैनगंगा मैदान:**

चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांच्या सीमेवरून वाहणाऱ्या वैनगंगा नदीच्या पूर्वेस व पश्चिमेस भंडारा व गोंदिया जिल्ह्यांत उर्ध्व वैनगंगा मैदान, तर चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत निम्न वैनगंगा मैदान पसरलेले आहे.

६) **पूर्वेकडील टेकड्या:**

महाराष्ट्राचा अतिपूर्वेकडे पूर्व सीमेलगत गोदावरी व महानदी या नद्यांचा जलविभाजक म्हणून अनेक टेकड्या आहेत. त्यात प्रामुख्याने उत्तरेकडून दक्षिणेकडे गोंदिया जिल्ह्यात "दरकेसा टेकड्या" गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड, भामरागड व अहिरी टेकड्यांचा समावेश होतो.

७) **प्राणहिता खोरे:**

पैनगंगा, वर्धा व वैनगंगा या नद्या मिळून तयार होणारी प्राणहिता नदी गोदावरी नदीची उपनदी आहे. त्यामुळे प्राणहिता खोरे हा गोदावरी खोऱ्याच्या उपविभाग आहे. प्राणहिता नदी खोऱ्याचे संपूर्ण पूर्व पठार व्यापलेला असून विदर्भातील सर्व जिल्ह्यांचा यात समावेश होतो. या नदीखोऱ्याचा उतार दक्षिणेकडे आहे

**६) महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील डोंगर:**

१) **जळगाव** : घोडसगाव, हस्ती, शिरसोली, चांदोर.

२) **धुळे** : धानोरा, गाळणा.

३) नंदुरबार : अस्तंभा.

४) **नाशिक:** साल्हेर-मुल्हेर, सातमाळ, वणी, मांगी-तुंगी, चांदवड.

५) **अहमदनगर:** कळसुबाई, बाळेश्वर, हरिश्चंद्रगड, अदुला.

६) **मुंबई उपनगर व जिल्हा:** कोन्हेरी, खंबाला, शिवडी, अँटॉप हिल, पाली, मलबार हिल.

७) **ठाणे:** तुंगार.

८) **पुणे:** तसूबाई, अंबाला, ताम्हाणी, शिंगी , पुरंदर.

९) **सातारा:** सीताबाई, बामणोली, परळी, आगाशिव, म्हस्कोबा, मढोशी, मांढरदेव, यवतेश्वर, शंभू महादेव.

१०) **सांगली:** कमळभैरव, होनाई, मल्लिकार्जुन, दंडोबा, बेलगवाड, आष्टा, आडवा, मुंचुंदी, शुक्राचार्य.

११) **सोलापूर:** रामलिंग, महादेव, बालाघाट, शुक्राचार्य.

१२) **कोल्हापूर:** उत्तर दूधगंगा, दक्षिण दूधगंगा, पन्हाळा, चिकोडी, दक्षिण सह्याद्री.

१३) **औरंगाबाद:** अजिंठा, चौक्या, सुरपालनाथ.

१४) **उस्मानाबाद:** बालाघाट, नळदुर्ग, तुळजापूर.

१५) **नांदेड:** मुदखेड, निर्मळ, सातमाळा, बालाघाट.

१६) **परभणी:** अजिंठा व बालाघाट.

१७) **हिंगोली:** हिंगोली डोंगर.

१८) **बीड,लातूर:** बालाघाट डोंगर.

१९) **नागपूर**: गरमसूर, हादागड, सातपुडा डोंगर.

२०) **भंडारा:** अंबागड.

२१) **गोंदिया:** नवेगाव, प्रतापगड, गायखुरी.

२२) **चंद्रपूर:** चांदूरगड, पेरजागड.

२३) **गडचिरोली:** चिकियाला, सिरकोंडा, रियागड, सुरजगड, भामरागड.

२४) **वर्धा:** रावणदेव, गरमसूर, नांदगाव, मालेगाव.

२५) **अमरावती**: धारणी, गाविलगड, चिखलदरा.

२६) **वाशीम:** अजिंठा डोंगर.

२७) **यवतमाळ:** अजिंठा डोंगर.

**७) मृदांचे प्रकार:**

१) **काळी मृदा:** अग्निजन्य (बेसॉल्ट) खडकाचा अपक्षय होऊन या मृदेची निर्मिती झाली आहे. या मृदेस "रेगूर मृदा" असेही म्हणतात. मृदेतील टिटॅनिफेरस, मॅग्नेटाईट या घटक द्रव्यामुळे मृदेला काळा रंग प्राप्त झाला आहे. या मृदेमध्ये चुनखडी, पोटॅश, लोह, कॅल्शियम, मॅग्नेशियम या घटक द्रव्यांचे प्रमाण अधिक असते, तर नायट्रोजन फॉस्फरस आणि ईतर द्रव्यांचे प्रमाण कमी असते. ही अत्यंत सुपीक मृदा समजली जाते. यामध्ये पाणी धरुन ठेवण्याची क्षमता जास्त असते. महाराष्ट्रात ही मृदा प्रामुख्याने अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, अहमदनगर, जळगाव, बीड या जिल्ह्यांमध्ये आढळते. महाराष्ट्रात काळ्या मृदांमध्ये कापूस, ऊस, फळे, गहू, ज्वारी, कडधान्ये ही पिके घेतली जातात.

२) **जांभी मृदा:** ज्या प्रदेशात २००० मिमी पेक्षा जास्त पर्जन्य व निश्चित कोरडा कालखंड असलेल्या प्रदेशात जांभी मृदा आढळते. सतत पाणी झिरपण्याने खडकातील क्षार व सिलिकाचे कण वाहून नेले जातात. परिणामत: लोह व अल्युमिनियमचे मृदेतील प्रमाण वाढते. या मृदेमध्ये नायट्रोजन, फॉस्फरस या सेंद्रिय द्रव्यांचे प्रमाण कमी असते. या मृदेची सुपीकता कमी आहे. महाराष्ट्रात रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, कोल्हापूर, सातारा या जिल्हयात ही मृदा आढळते. या मृदेमध्ये तांदूळ हे प्रमुख पिके घेतली जाते. डोंगर उतरणीवर फलोत्पादन केले जात आहे.

३) **गाळाची मृदा:**

नदी प्रवाहाच्या सततच्या संचयनामुळे नदी खोऱ्यांच्या सखल भागात विशेषत: पूर मैदानात ही मृदा आढळते. बारीक पोत व पाण्याची सहज उपलब्धता, तसेच सतत नवीन गाळ जमा होऊन ही मृदा सुपीक बनते. महाराष्ट्रातील मुख्य नद्यांच्या सखल भागात व पूर मैदानात ही मृदा आढळते. उत्तर महाराष्ट्रातील तापी-पूर्णा खोऱ्यात खूप खोलवर गाळाचे संचयन झाले आहे. या भागात विस्तीर्ण गाळाच्या मृदांचे क्षेत्र आहे. गाळाची मृदा सुपीक असल्याने या मृदेत विविध पिकांचे उत्पादन घेतले जाते.

४) **तांबडी-पिवळसर मृदा:**

महाराष्ट्रात अतिप्राचीन काळातील ग्रॅनाईट आणि नीस प्रकारच्या खडकांवर अपक्षय क्रिया होऊन तांबडी मृदा तयार झालेली आहे. ही चिकणमाती व वाळूमिश्रित मृदा असून, तिच्यात लोहाचे प्रमाण जास्त असल्याने तिला तांबडा रंग प्राप्त होतो. तिचा रंग पिवळा, तपकिरी किंवा राखी असू शकतो.

मृदेमध्ये चुनखडी, कार्बोनेट, फॉस्फरिक ॲसिड, सेंद्रिय द्रव्य व पोटॅशचे प्रमाण अत्यल्प असते. ही मृदा नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यात आहे. या मृदेमध्ये बाजरी, भुईमूग, बटाटे आणि भात ही पिके घेतली जातात.

**८) मृदा अवनती:**

मृदा अवनती म्हणजे, मृदेची सुपीकता कमी होणे, त्यांच्या गुणात्मक मुल्यांचा ऱ्हास होणे या स्थितीला मृदेची अवनती असे म्हणतात. मृदेचा अतिवापर, अतिजलसिंचन, रासायनिक खतांचा अनियोजित वापर इत्यादीमुळे मृदेची अवनती होते. चक्रीय पीक पद्धती, जमीन काही काळ पडीक ठेवणे, सेंद्रिय खतांचा वापर इत्यादी उपयांद्वारे मृदेची अवनती कमी करता येते. महाराष्ट्रात जलसिंचन क्षेत्रात मृदा अवनतीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. आणि जलसिंचनामुळे क्षार मृदेच्या वरच्या थरात जमा होऊन वरचा थर नापीक बनत आहे. त्यामुळे जलसिंचन प्रदेशातील विस्तारीत क्षेत्र पीक लागवडीसाठी नापिक बनत चालले आहे.

**८) प्रदेश संकल्पना:**

प्रदेश म्हणजे काय? याचे अगदी सोपे सरळ उत्तर म्हणजे "एखाद्या विस्तीर्ण क्षेत्राचा नैसर्गिक घटकांत साम्य आसनारा लहानसा भुभाग होय' असे उत्तर देता येईल. एखादे क्षेत्र जेव्हा प्रदेश म्हणून विचारात घेतले जाते तेव्हा त्यात पुढील गोष्टी असणे अपेक्षित असतात.कमीत कमी एका किंवा जास्त गुणधर्माबाबत क्षेत्रात साम्यता किंवा एकरुपता असणे, क्षेत्रीय संलग्नता, क्षेत्रास सर्वसामान्य व्यक्तिमत्व असणे, साधर्म्य. बहुतांशी कापूस क्षेत्र मध्यम पर्जन्याच्या प्रदेशात एकवटलेले आहे.

**९) भूमी संसाधने व भूमी उपयोजन:**

महाराष्ट्राचे क्षेत्रफळ सुमारे ३०७७८० चौ.किमी. आहे. भूमी संसाधनांचा सर्वात जास्त वापर शेतीसाठी केला जातो. शेतीसाठी भूमीची उपलब्धता, तीचा उंचसखलपणा आणि उतार यांवर ठरते. तर शेतीसाठी उपयुक्तता प्रदेशातील पर्जन्य व मृदांची सुपिकता यांवर अवलंबुन असते. कोकण व पश्चिम घाट या भागात उंचसखलपणा जास्त आहे. त्यामुळे तेथील भूमीच्या वापरावर मर्यादा पडतात. राज्यातील पूर्वेकडील प्रदशात इतर उद्देशांसाठी विशेषत: वनक्षेत्र तसेच खनिज उत्पादनासाठी बरीचशी जमीन वापरली जात असल्याने या भागातही शेतीसाठी जमीन कमी प्रमाणात उपलब्ध होते. मध्य महाराष्ट्रात पर्जन्य कमी प्रमाणात मिळते. अर्थात यामुळे जमिनीची

उपलब्धता कमी होत नाही, मात्र तिची शतीसाठी उपयुक्तता बरीचशी कमी होते. तापी, गोदावरी, वर्धा-वैनगंगा, भीमा, कृष्णा इत्यादी नद्यांच्या पूर मैदानातील भूमी शेतीसाठी उपयुक्त आहे.

**१०) भूमी उपयोजन:**

१) लागवडीखालील क्षेत्र:

महाराष्ट्राला लाभलेल्या भूमीपैकी 56.6 टक्के क्षेत्राचा उपयोग पिके घेण्यासाठी केला जातो. यालाच लागवडीखालील क्षेत्र म्हणतात. प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, जलसिंचन सुविधा, उताराचे स्वरुप यांचा परिणाम लागवडीखालील क्षेत्रावर होतो. पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ येथील 70 टक्के क्षेत्र लागवडीखाली आहे. कोकण तसेच पूर्व विदर्भामध्ये जमिनीचे तीव्र उतार व वनांचे आच्छादन यामुळे लागवडीखालील क्षेत्र कमी आहे. वाढत्या लोकसंख्या आणि नागरीकरण यामुळे शेतजमिनीचा वापर घरांसाठी, वस्त्यांसाठी होत असल्याने शहरी भागाजवळील लागवडीखालील क्षेत्रामध्ये घट होत आहे.

२) वनक्षेत्र:

महाराष्ट्रामध्ये पडणारा सरासरी पर्जन्य सरासरी १००० मिमी आहे. पर्जन्याच्या वितरणावर वनाचे क्षेत्र अवलंबून असते. सह्याद्रीच्या पूर्वकडील नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांच्या पश्चिम भागात वने आढळतात. मध्ये महाराष्ट्र हे अवर्षणप्रवण क्षेत्र असल्याने वनांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. तेथे सपाट भूमीचा वापर शेतीसाठी केला जातो. प्रत्येक प्रदेशाचा पर्यावरण समतोल राखण्यासाठी एकूण क्षेत्रफळाच्या ३३ टक्के क्षेत्र वनांखाली असणे आवश्यक असते. महाराष्ट्रात हे प्रमाण खूप कमी आहे. राज्याच्या १७ टक्के क्षेत्रामध्ये वने आहेत. वनांचे क्षेत्र वाढवण्यासाठी सामाजिक वनीकरण योजना राबवून वनांखालील क्षेत्र वाढवण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे, परंतू सामाजिक पातळीवर हे प्रयत्न होने गरजेचे आहे.

३) पडीक क्षेत्र:

ज्या क्षेत्रामध्ये कधीही पीक घेणे शक्य नसते ते कायम पडीक क्षेत्र होय. मुसळधार पर्जन्यामुळे मृदेचा उत्पादक थर वाहून जातो व जमिनी कायमच्या नापीक होतात. तसेच काही जमिनीवर पाणी साठून तेथे दलदल तयार होते त्यामुळे पीक येऊ शकत नाही. विशेषत: कोकण किनाऱ्यावरील खारभूमी प्रदेश कायम पडीक स्वरुपात आहेत. महाराष्ट्राचे मोठे क्षेत्र पर्जन्यावर अवलंबून आहे.

एखाद्या वर्षी पेरणीसाठी आवश्यक तेवढा पाऊस झाला नाही तर जमिनी पडीक ठेवाव्या लागतात. अशा जमिनी चालू पडीक क्षेत्र म्हणून ओळखली जाते. जलसिंचन सुविधा पुरवल्यास हे क्षेत्र लागवडी खाली आनता येईल. तसेच त्या जमिनीचा वनशेती किंवा फलोत्पादनासाठी उपयोग करता येईल. कोणत्याही प्रदेशातील भूमी उपयोजन हे शेती व्यवसायावर नियंत्रण करणारा मुख्य प्राकृतिक घटक व मानव समाज यांच्या परस्परक्रियेतून निर्माण होत असते.

**४) बिगर शेती क्षेत्र:**

ज्या क्षेत्रामध्ये शेती केली जात नाही त्या क्षेत्राला बिगरशेती क्षेत्र असे म्हणतात. वसाहतीसाठी भूमीचा वापर केला जातो. महाराष्ट्रामध्ये नागरीकरण तसेच औद्योगिकीकरण वेगाने वाढत आहे. अन्य वापरात असलेल्या क्षेत्राचा उपयोग वस्त्यांसाठी किंवा उद्योगधंद्यासाठी केला जात आहे.